# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.08.2025** **वारःरविवार**

---

- पुणे ते नागपूरच्या अजनी दरम्यान धावणाऱ्या वंदे भारत ट्रेनचा आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार आरंभ

- ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याची वायु दलप्रमुखांची माहिती.

- देशाच्या संरक्षण निर्यातीत येत्या दोन ते तीन वर्षात दुपटीने वाढ होईल- डीआरडीओचे सचिव डॉ. समीर कामत यांनी व्यक्त केला विश्वास.

- राज्यात सर्वत्र विविध उपक्रमांनी रक्षाबंधनाचा सण तसंच जागतिक आदिवासी दिन साजरा

आणि

- उत्तराखंडमध्ये अडकलेले राज्यातले बहुतांश पर्यटक सुखरुप.

**<u>वंदेभारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्यांच्या बंगळुरू दौऱ्यात  पुणे ते नागपूरच्या अजनी रेल्वे स्थानका दरम्यानच्या वंदे भारत ट्रेनचा दूरस्थ पद्धतीने आरंभ करणार आहेत. बेंगळुरूच्या KSR रेल्वे स्थानकावरून पंतप्रधानांच्या हस्ते पुणे ते नागपूर, बंगळुरू  ते बेळगावी आणि अमृतसर ते माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात येणार आहे. अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून ८८१ किमी अंतर कापणारी ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत असेल. ही जलदगती गाडी ७३ किमी प्रतितास वेगाने धावेल आणि नागपूर ते पुणे दरम्यान १० थांबे घेईल, असं मध्य रेल्वेने आपल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलं आहे.

**<u>पाकिस्तानीविमानं</u>**

ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतानं पाकिस्तानची सहा विमानं पाडल्याचं भारतीय वायु दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग यांनी काल बेंगळुरू इथं सांगितलं. १६ व्या एअरचीफ एल. एम. कात्रे स्मृती व्याख्यानात ते बोलत होते.

भारतानं पाडलेल्या विमानांमध्ये पाकिस्तानी हवाई दलाच्या पाच लढाऊ विमानांशिवाय अॅवॅक्स या सूचना आणि नियंत्रण म्हणजेच टेहळणी विमानाचाही समावेश असल्याचं वायु दल प्रमुखांनी सांगितलं. त्यांनी काही चलचित्रांच्या मदतीने भारताच्या कामगिरीची माहिती दिली. ही सर्व विमानं जवळपास तीनशे किलोमीटर अंतरावरून पाडण्यात आल्याचं सांगतानाच जमिनीवरून हवेत मारा करून विमानं पाडण्याचा हा उच्चांक ठरला असल्याचंही त्यांनी पुढे सांगितलं. भारताच्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचा शहबाज जाकोबाबाद हवाई तळ उद्ध्वस्त झाला, त्यामध्ये F16 सारख्या काही विमानांचंही नुकसान झाल्याचं सिंग यांनी नमूद केलं.

**<u>संरक्षण</u>**

देशातून गेल्या वर्षी २३ हजार कोटी रुपये इतकी संरक्षण निर्यात झाली, येत्या दोन ते तीन वर्षांत ती दुप्पट होईल असा विश्वास संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव आणि पुण्याच्या डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी अर्थात DIAT शिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत व्यक्त केला. DIAT चा १४ वा पदवीदान समारंभ कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. भारतीय संरक्षण सामग्रीला मध्य पूर्वेकडील देश, आफ्रिका आणि दक्षिण आशियाई देशांमधून मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचं त्यांनी सांगितलं. ब्रह्मोस क्षेपणास्त्राची छोटेखानी आवृत्ती विकसित करण्याचं काम प्रगतीपथावर असून झोरावर हा वजनाने हलका रणगाडाही वेगानं विकसित होत आहे, असंही डॉ. कामत यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूर राबवताना भारतीय सैन्य दलांना डीआरडीओनं विकसित केलेल्या शस्त्रास्त्रांची, उपकरणाची लक्षणीय मदत झाल्याचंही त्यांनी पदवीदान समारंभात बोलताना नमूद केलं.

**<u>इंट्रो-वॉका</u>**

**<u>सातनवरी-मक्षी</u>**

डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सुविधांनी सुसज्ज असं नागपूर ग्रामीणमधील सातनवरी हे गाव स्मार्ट इंटीलिजंट होत आहे. एक वृत्तांत...

**<u>स्क्रीप्ट-</u>**

***अवघ्या १८०० रहिवाशांचं सातनवरी हे गाव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूर केलेल्या राज्य-समर्थित पथदर्शी प्रकल्पांतर्गत पहिलं स्मार्ट बुद्धिमान गाव होत आहे. ड्रोनच्या सहाय्यानं शेती आणि स्मार्ट सिंचनापासून ते मोबाइल बँकिंग, डिजिटल शाळा आणि देखरेख ठेवणारी प्रगत यंत्रणा अशा प्रत्येक बाबतीत इथं अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला जाईल. सातनवरीची निवड, त्याचा व्यवस्थापनाच्या दृष्टीनं आकार, भक्कम संपर्क व्यवस्था आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेनुसार करण्यात आली. केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाच्या अंतर्गत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेस आणि पंधरा कंपन्या मिळून हे काम करणार आहेत. या पथदर्शी सुविधांचा***

***लाभ घेण्यासाठी सातनवरीच्या ग्रामस्थांना प्रशिक्षणही देण्यात येईल. या गावाला डिजिटल सुविधा पुरविण्यासाठी सुरू असलेल्या उपक्रमांमध्ये शेतीला प्राधान्य दिलं आहे. शेतामध्ये बसविण्यात आलेल्या सेन्सरमुळे शेतातील पेरणीपासून कापणीपर्यंत तसंच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, पीक पद्धतीचं नियोजन, पेयजलाची गुणवत्ता, तलावांमधील मत्स्यपालनासाठी आवश्यक पाण्यातील घटक इत्यादि सर्व माहिती डॅशबोर्डवर दिसणार आहे. व्हॉइस टीम गावात तळ ठोकून आहेत. हा प्रयोग यशस्वी झाला तर राज्यातल्या शेकडो गावांसाठी तो पथदर्शी ठरणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.***

**<u>रक्षाबंधन</u>**

बहिण- भाऊ या प्रेमाच्या नात्याचा राखी पौर्णिमेचा सण काल राज्यभरात उत्साहात साजरा करण्यात आला. मुंबईत राजभवन इथं दृष्टिहीन विद्यार्थिनी, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी विद्यार्थिनी, मुंबई महानगर पालिकेअंतर्गत महिला बचत गटाच्या सदस्यांनी तसंच पालिकेच्या शाळांमधल्या विद्यार्थिनींनी रक्षाबंधनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना राखी बांधून औक्षण केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल या निमित्ताने लाडक्या बहिणींशी संवाद साधला आणि त्यांच्याकडून राखी बांधून घेतली. महिलांच्या ५० टक्के सहभागाशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे सांगून बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी १०जिल्ह्यांमध्ये 'बचत गट मॉल्स' तयार करण्यात येणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. लाडकी बहीण योजना आगामी पाच वर्षे अखंडपणे सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. धुळे जिल्हा पोलिसांनी रक्षाबंधनानिमित्त महिलांच्या सुरक्षेसाठीच्या ‘डायल ११२’ या मदतवाहिनीचा वापर करण्याचं आवाहन करणारा एक खास व्हिडिओ काल प्रसारित करून महिलांना रक्षाबंधनाची आगळी भेट दिली.  पिंपरी चिंचवड महापालिकेच्या भोसरी येथील इंद्रायणीनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी लेह लडाखमधील आपल्या वीर जवानांना स्वतःच्या हाताने राख्या तयार करून पाठवल्या.

परभणी आणि सांगली जिल्ह्यात विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. छत्तीसगडच्या बिलासपूर इथून आलेली, ऑपरेशन सिंदूर या विषयावर आधारित ३५ किलो वजनाची, ३० फूट लांब आणि ६ फूट रुंद अशी भव्य राखी शिर्डी इथं श्री साई चरणी अर्पण करण्यात आली.

**<u>आदिवासीदिन</u>**

राज्यात ठिकठिकाणी काल जागतिक आदिवासी दिनही विविध कार्यक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. नवी मुंबईत वाशी इथं आदिवासी सहयाद्री प्रतिष्ठानच्या वतीने कोपरखैरणे ते वाशी दरम्यान आदिवासी सांस्कृतिक फेरीसह विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होत. त्यामध्ये तरुण-तरुणींनी पारंपरिक नृत्यं, लोकगीतं सादर केली.

नंदुरबार शहराच्या अनेक भागातही आदिवासी दिनाचं औचित्य साधून मिरवणुकांचं आयोजन करण्यात आलं. या मिरवणूकांमध्ये पारंपरिक पेहराव परिधान केलेले आदिवासी बांधव आदिवासी गाण्यांवर आणि वाद्यांवर ठेका धरत उत्साहाने सहभागी झाले होते.

आदिवासी समुदायाच्या ऐतिहासिक योगदानाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांच्या हक्कांप्रती अधिक सजगता निर्माण करण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

**मार्कंडेय**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनींचा रथोत्सव काल सोलापुरात मोठ्या भक्तीभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त सिद्धेश्वर पेठेतील मार्कंडेय मंदिरात विविध धार्मिक विधी पार पडले.

**तिरंगा**

महाराष्ट्र शासनाचा पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभाग तसंच राज्य पाणी आणि स्वच्छता विभागाच्या निर्देशानुसार "हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता – स्वतंत्रतेचा उत्सव, स्वच्छतेच्या संग" ही राष्ट्रीय पातळीवरील जनजागृती मोहीम वाशिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने काल वाशिम जिल्ह्यातील कारंजा पंचायत समिती अंतर्गत शिवन बुद्रुक येथे रॅली काढण्यात आली. तसेच “स्वच्छ सुजल गाव प्रतिज्ञा" शालेय विद्यार्थ्यांमार्फत सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

काल राज्यात विविध ठिकाणी क्रांतीदीनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आलं.सांगलीतील जुना स्टेशन चौकात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून क्रांती ज्योती पदयात्रा काढण्यात आली. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यांना पुष्पहार घालून अभिवादन करून सदरची क्रांतीज्योत मार्केट यार्ड समोरील हुतात्मा स्मारक इथं आली.

**<u>शिधापत्रिका रद्द</u>**

गेल्या सहा महिन्यांपासून अंत्योदय तसंच प्राधान्य योजनेतून धान्य न उचलणाऱ्या शिधापत्रिकांवरचं धान्य बंद करण्याचे आदेश राज्य शासनानं दिले आहेत. यातून शिल्लक राहिलेलं धान्य प्रतीक्षा यादीतल्या शिधापत्रिकाधारकांना देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. राज्यातल्या ३ लाख ३३ हजार ८८१ शिधापत्रिकांवरचं धान्य गेल्या सहा महिन्यांपासून उचललं गेलं नसल्याचं राज्य शासनानं निदर्शनाला आणून दिलं आहे.

**<u>वन्यप्राणीतस्करी</u>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाला वन्यजीवांची तस्करी केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. या प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन किंकाशू, दोन पिग्मी मार्मोसेट्स आणि ५० अल्बीनो रेड इयर्ड स्लायडर प्रजातीची कासवं असे जिवंत वन्यप्राणी आढळून आले.

**<u>पर्यटक</u>**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली भागात झालेल्या भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुरात अडकलेल्या महाराष्ट्रातील १७२ पर्यटकांपैकी १७१ पर्यटक उत्तराखंडमध्ये सुरक्षित आहेत. तर एका बेपत्ता पर्यटकाचा शोध सुरू आहे. राज्य आपत्कालीन कृती केंद्राने दिलेल्या माहितीनुसार मते, माटली, जॉली ग्रँट आणि उत्तरकाशीसारख्या ठिकाणी १६० पर्यटक सुरक्षित आहेत. त्यापैकी अनेकांनी त्यांच्या मूळ प्रवास कार्यक्रमानुसार प्रवास पुन्हा सुरू केला आहे. हर्सिलमध्ये अडकलेले अकरा पर्यटक देखील सुरक्षित आहेत.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि विदर्भात येत्या दोन दिवसांत बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**